महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोना न. ०२२-२४०९३११०
०२२-२४०३१४९८
फॅक्स नं.०२२-२४०९३११०
www.cpfmseb.२०११@gmail.com
website :www.mahadiscom.in

एस्टेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मं ुबई ४०० ०१९.

क्र.लेवि/भनिनि/अं.प्र.ग/ ० \ 237

दिनांक : 29 JAN 2018

**परिपत्रक क्रं.२११**

**विषय**:- भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाची प्रकरणे तसेच कर्मचारी निवृत्ती वेतन योजना १९९५ चे निवृत्ती वेतन प्रस्ताव तातडीने भनिनि कार्यालय धारावी येथे पाठविण्याबाबत.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास येते की, सेवानिवृत्त कर्मचा-याचे भनिनि अंतिम प्रदानाची प्रकरणे तसेच निवृत्ती वेतनाचे व EDLI चे प्रस्ताव त्वरीत / तातडीने पाठवले जात नाहीत. तसेच जे पाठवले जातात त्यामध्ये ही अनेक प्रकारच्या त्रुटी असतात, परिणामी त्रुटीपूतेतसाठी सदरचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयास परत पाठवावे लागतात त्यामुळे कर्मचा-यास अंतिम भनिनिची रक्कम व निवृत्ती वेतन मिळण्यास विलंब होतो. अंतिम भनिनिची प्रकरणे पाठवताना ब-याच वेळा खालील प्रकारच्या त्रुटी आढळून येतात. करीता क्षेत्रिय कार्यालयाने कर्मचा-याचे प्रस्ताव पाठवताना खालील दक्षता बाळगुन भ.नि.नि. विभागास प्रस्ताव पाठवावे.

१. भ.नि.नि. / अंतिम प्रदान व पुरक देयके आणि आगाऊ अग्रिम यांचा अर्ज Online भरलेला नसतो, करिता यापुढे फक्त Online अर्ज स्विकारले जातील, याची नोंद घ्यावी तसेच काही त्रुटी आढळल्यास हे अर्ज Online परत केले जातील त्रुटींची प्रतिपूर्ती Online पाहून करण्यात यावी त्यामुळे यापुढे हे अर्ज क्षेत्रिय कार्यालयास परतही केले जाणार नाहीत.

२. कर्मचा-याची Relive order / Termination / Resignation ची Order प्रस्तावा सोबत जोडण्यात यावी.

३. कर्मचा-याचा शेवटच्या १२ महिन्याचा भ.नि.नि. कपातीचा तक्त्यामध्ये, पगारा व्यतिरिक्त जर काही रक्कम दिली गेली असेल तर त्याची वेगळी माहिती देण्यात यावी.

४. कर्मचा-याला Excess Payment दिले गेले असेल तर (-) S form, (-) Schedule व IBA जोडलेले नसतात ते प्रस्तावास सोबत जोडण्यात यावीत.

५. कर्मचा-यांचा नावामध्ये फरक असतो, करीता नावासाठी नमुना क्र.३.६ जोडण्यात यावा.

६. B.O.T. ची रक्कम भरलेली नसते. प्रस्ताव पाठविताना, B.O.T. ची रक्कम भरणा भरुन प्रस्ताव पावतीसह भ.नि.नि. विभागास पाठवण्यात यावा.

७. मृत कर्मचा-यांच्या वारसांचा अंतिम प्रदानाचा प्रस्तावही त्वरीत पाठवणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे निवृत्ती वेतन योजना १९९५ चा प्रस्ताव व EDLI प्रस्ताव एकत्र पाठवणे आवश्यक आहे. अन्यथा हे प्रस्ताव क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी कार्यालय स्विकारत नाहीत. तसेच प्रस्ताव पाठवताना मूळ मृत्यू प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

८. मृत कर्मचा-यांच्या प्रस्ताव पाठवताना नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीने आपल्या नावे व स्वाक्षरीने नमुना क्र. १२ चा अर्ज पाठविणे आवश्यक आहे.

९. प्रस्तावासोबत Original Cancelled Cheque व Pass Bank च्या पहिल्या पानाची Zerox, Bank A/c No. व I.F.S.C.I. Code स्पष्ट दिसेल अशी पाठवण्यात यावी.

प्रस्ताव पाठवताना वरील प्रमाणे काळजी घेण्याविषयी क्षेत्रिय भनिनि आयुक्त, बांद्रा, मुंबई यांनी सूचना दिलेल्या आहेत. त्याची जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील. भनिनि कार्यालय ज्या त्रुटीसाठी अर्ज Reject परत करते ती सर्व कारणे क्षेत्रिय कार्यालयाशीच संबंधित असतात त्यामुळे क्षेत्रिय कार्यालयाने Online कारण पाहून त्या त्रुटीची पूर्तता करण्यात यावी.

या परिपत्रकाची तात्काळ अंमल बजावणी करुन तसेच त्याचे काटेकोरपणे पालन करुनच त्रुटी नसलेली सेवानिवृत्ती नंतरची सर्व प्रकरणे पुढील काळात भ.नि.नि. कार्यालयास तात्काळ पाठवावीत.

राळपवार

सचिव
विश्वस्त मंडळ (भनिनि)
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

प्रत- प्रेषण यादीप्रमाणे.

D:\Telang\FS.doc172